दिनांक-०६/१०/२०१९

# प्रेसनोट

## ''स्थानिक गुन्हे शाखेकडून एक अवैद्य गावठी पिस्टल २ जिवंत बुलेट हस्तगत''

मा.पोलीस अधीक्षक श्री. संदीप पाटील यांनी पुणे ग्रामीण जिल्हयातील आगामी विधानसभा निवडणुक सन २०१९ ही शांततेत पार पाडण्याकरीता अवैद्य अग्नीशस्त्रे बाळगणाऱ्या इसमांबाबत बातमी काढून जास्तीत जास्त अवैद्य अग्नीशस्त्रे जप्त करण्याकरीता विशेष मोहीम राबविणेबाबत स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण यांना आदेश दिलेले होते.

मा. पोलीस अधीक्षक श्री. संदीप पाटील सो. यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यारीता स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक श्री. पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली वेगवेगळे पथके तयार करून अवैद्य अग्नीशस्त्रे पकडणेकामी विशेष मोहीम राबविली होती. त्याप्रमाणे विशेष पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी दिनांक ०६/१०/२०१९ रोजी गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम पानशेत बाजारपेठेमध्ये एक केसरी रंगाचा टी शर्ट व काळे रंगाची ट्रॅक पॅंट घातलेला इसम त्याचे कब्जात पिस्टलसारखे हत्यार आपले कब्जात बाळगल्या स्थितीत आहे अशी माहीती मिळाल्याने पो.स.ई. अमोल गोरे, सहा.फौज.दिलीप जाधवर, श्रीकांत माळी, पो.हवा.रविंद्र शिणगारे, पो.हवा.राजू चंदनशिव, पो.कॉ.अमोल शेडगे यांनी १४.०० वा.चे सुमारास पानशेत बाजारपेठेमध्ये, ता.वेल्हा, जि. पुणे येथून इसम नामे रामा बबन मरगळे, वय २४ वर्षे, रा. पानशेत कुरण बुद्रुक, वरचीवाडी, ता. वेल्हा, जि. पुणे यास ताब्यात घेवून दोन पंचांचे समक्ष अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात एक गावठी बनावटीचे पिस्टल व दोन जिवंत राऊंड अशा रू. १०,२००/-किंमतीचा मुद्देमाल मिळून आलेला असून त्याचेविरूध्द वेल्हा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री. देवकर यांचे मार्गदर्शनाखाली वेल्हा पोलीस स्टेशन येथे करण्यात येणार आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकामार्फत यापुढेदेखील अशाच प्रकारच्या कारवाई सुरु राहणार आहेत.

---

**पुणे ग्रामीण पोलीस**